# पुणे महानगरपालिका

PCACS
PUNE MUNICIPAL CORPORATION

## जाहिरात प्रकटन

आरोग्य खात्याकडील पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे महानगरपालिका यांच्या गाडीखाना येथील प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिटकरीता पुणे मनपा रुग्णालयांतील FICTC केंद्रासाठी नेमणूकीसाठी खालील अस्थायी पदावर 6 महिन्याकरीता करार पद्धतीने एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने खालील पदे तोंडी मुलाखत पध्दतीने भरणेत येत आहेत. जाहिरातीत नमूद केले प्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | समुपदेशक | रु.22,365/- | 1) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण व मास्टर ऑफ सोशल वर्कची (MSW) पदवी उत्तीर्ण.<br>2) एच.आय.व्ही. एड्स विषयक समुपदेशनाचा किमान 3 वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक. | 11 | अ.जा.-2, अ.ज.-1, वि.मा.प्र.-1, इ.मा.व.-2, ई.डब्ल्यू.एस.-1 अराखीव (खुला)-4 |
| 2 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | रु.22,365/- | 1) मान्यता विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस.सी.) व डि.एम.एल.टी. उत्तीर्ण<br>2) एच.आय.व्ही. रक्तचाचणी कामाचा लॅबोरेटरी मधील किमान 3 वर्षाचा अनुभव आवश्यक. | 1 | 1 सर्वांसाठी खुला (आरक्षण नाही) |

**अटी व शर्ती :-**

1) वयोमर्यादा - एड्स नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत शासकीय किंवा निमशासकीय संस्थेकडे काम केलेले वय वर्ष 60 पर्यंतचे उमेदवार अर्ज करू शकतील. इतर उमेदवारांसाठी जाहिरातीच्या दिनांकास किमान वय 18 पूर्ण असावे व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा 5 वर्षे शिथिल राहिल.
2) उमेदवारांनी जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांन्त परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.
3) उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करून कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. तसेच त्यापुष्ठयर्थ जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (अ.ज. प्रवर्गाकरीता) साक्षांकित प्रत सादर करावी.
4) जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत बदल, निवड यादी व नियुक्ती कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे तसेच प्रशासकीय व अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेत, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे आधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना राहतील.
5) रिक्त पदांसाठी संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व आधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वतःकडे राखून ठेवित आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.
6) उमेदवारांनी अर्ज स्वतःच्या हस्ताक्षरात व अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजच्या फोटो व स्वाक्षरीसह तसेच सर्व दृष्टीने परिपूर्ण असावे.
7) उमेदवारांचे अपूर्ण अर्ज किंवा चूकीचे भरलेले अर्ज, खोटी माहिती दिली असल्यास तसेच वय, शैक्षणिक अर्हता गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव, इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती (झेरॉक्स), जोडले नसलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.
8) उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (महिला उमेदवारांचे लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

9) वरील पदांकरीता वरील प्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांनी पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र, 1 ला मजला, 663, शुक्रवार पेठ, गाडीखाना, पुणे 411002 येथे जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पुढील 8 दिवसांपर्यंत सोमवार ते शुक्रवार (शासकीय सुट्टी वगळून) सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत समक्ष अर्ज सादर करावयाचा आहे. या व्यतिरिक्त दुस-या पध्दतीने केलेले अर्ज तसेच विहित दिनांकानंतर व वेळेनंतर केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

10) पात्र उमेदवारांची यादी व मुलाखतीचे ठिकाण, तारीख, वेळ, इ. पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. उमेदवारांना स्वतंत्ररित्या फोन, मॅसेज, ईमेल, इ. केले जाणार नाहीत.

11) पात्र उमेदवारांनी तोंडी मुलाखतीकरीता येताना मूळ कागदपत्रांसह मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने व वेळेपूर्वी 1 तास अगोदर उपस्थित रहावे. उमेदवारास कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

12) अपात्र उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकाराचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

13) गुणांकन पध्दत - शैक्षणिक अर्हता 20 गुण, अनुभव 20 गुण (किमान 3 वर्ष अनुभव आवश्यक), तोंडी मुलाखत 10 गुण.

14) अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

15) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहीत अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास, त्याची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल तसेच नियुक्ती झालेल्या उमेदवाराने दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

16) निवड झालेल्या उमेदवारांना राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत महानगरपालिका रुग्णालयांकडे FICTC केंद्रात काम करावे लागेल.

17) जाहिरातीतील पदे ही फक्त 6 महिन्याच्या काळासाठीच, अत्यंत अस्थायी, तात्पुरती व करार पद्धतीनुसार असून निवड झालेल्या उमेदवारांना पुणे महानगरपालिका सेवेत कायमस्वरूपी राहण्याचा अधिकार मागता येणार नाही अगर तसा हक्क सांगता येणार नाही.

18) निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन संस्थेकडे अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

19) निवड झालेल्या उमेदवारांना पुणे शहर एड्स नियंत्रण संस्थे बरोबर विहीत नमुन्यात रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करावा लागेल.

Raut

अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
तथा सहअध्यक्ष,
पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे महानगरपालिका

21/6/2024

दिनांक :-

उमेदवाराचा
पासपोर्ट
साईजचा फोटो
स्वाक्षरीसह

पुणे महानगरपालिका
उमदेवाराने भरावयाची माहिती

उमेदवाराने अर्ज सादर करावयाचा गट / प्रवर्ग :- ______________________

1) ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याचे नाव :- ______________________

2) उमेदवाराचे संपूर्ण नाव :- ______________________

आडनाव स्वतःचे नाव वडील / पतीचे नाव

3) जात / पोटजातः- ______________________ प्रवर्ग :- ______________

4) पत्ता :- अ) सध्याचा पत्ता :- ______________________

______________________

______________________

ब) कायमचा पत्ता:- ______________________

______________________

______________________

क) फोन नं. :- लॅडलाईनः- ______________________

मोबाईल :- ______________________

5) लिंग (पु / स्त्री) :- ______________

6) जन्म तारिख :- ______________ मुलाखतीच्या वेळेचे वय :- ______________ वर्ष

7) राष्ट्रीयत्व :- ______________

8) शैक्षणिक पात्रता :-

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे / मंडळाचे नाव | माध्यम | विषय | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एस.एस.सी. | | | | | |
| 2 | एच.एस.सी. | | | | | |
| 3 | पदवी / बी.एस.सी. | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | एम.एस.डब्ल्यू./<br>डि.एम.एल.टी., इ. | | | | | |
| | | | | | | |

9) इतर विशेष पात्रता /अनुभव (असल्यास) :- ____________________

____________________

10) एड्स विषयक समुपदेशन / रक्तचाचणी अनुभव :- ______________ वर्ष

ठिकाण :-

दिनांक :-

आपला / आपली विश्वासू
(अर्जदाराची स्वाक्षरी)